**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
17 डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे - 01
**दूरध्वनी क्र.** -020-26123066/67 **वेबसाईड** - www.mscepune.in **ई-मेल** mscepune@gmail.com

**दरपत्रक सूचना**

जा.क्र./मरापप/भांडार/रद्दी दरपत्रक/2022/3830
दिनांक : 02/08/2022.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे कार्यालयामार्फत विविध परीक्षांचे आयोजन करण्यात येते. या विविध परीक्षांच्या वापरलेल्या उत्तरपत्रिका, प्रश्नपत्रिका, टंकलिखित उत्तरपत्रिका, रिकामे बॉक्स, कापडी पिशव्या, मराठी व इंग्रजी वर्तमानपत्र, वापरात नसणारे बुकलेट, प्रपत्रे, फाईल्स इत्यादीची रद्दी विक्री करावयाची आहे. सदर रद्दी खरेदी करु इच्छिणाऱ्या नोंदणीकृत स्थंस्थेकडून पुढील अटी व शर्ती नुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत. विक्री करावयाच्या साहित्याचे विवरण परिषदेमध्ये प्रत्यक्ष कार्यालयीन वेळेमध्ये पाहावयास मिळेल.

**अटी व शर्ती** :-

1. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत विविध परीक्षांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये येणारे दस्तऐवज (वापरलेल्या उत्तरपत्रिका, प्रश्नपत्रिका, टंकलिखित उत्तरपत्रिका, रिकामे बॉक्स, कापडी पिशव्या, मराठी व इंग्रजी वर्तमानपत्र, वापरात नसणारे बुकलेट, प्रपत्रे, फाईल्स इत्यादीची रद्दी) हे गोपनीय स्वरुपाचे असल्याने पल्पिंग करतेवळी त्याचा दुरूपयोग होवू नये. असे निदर्शनास आल्यास आपणाविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
2. ज्या संस्थेची दरपत्रक मंजूर केले जाईल, त्या संस्थेला रु. 500/- च्या स्टॅम्प पेपरवर परिषदेने विहीत केलेल्या अटी व शर्तीनुसार परिषदेबरोबर करारनामा करुन द्यावा लागेल. त्यासोबत सुरक्षा अनामत म्हणून रक्कम रु. 10,000.00 (दहा हजार फक्त) भरावी लागेल.
3. रद्दीचे वजन ठरविण्यासाठी प्रथम रिकाम्या व नंतर भरलेल्या ट्रकचे वजन शासकीय वजन काट्यावर करावे लागेल. रद्दीने भरलेला ट्रक लोड होताच थेट वजन काट्यावर नेण्यात येईल. कार्यालयीन प्रतिनिधी समक्ष नोंद ग्राह्य धरण्यात येईल. किंवा परिषदेत वजन काटा (इलेक्ट्रीकल) आणून त्याचे वजन करुन गाडी परिषदेतून न्यावी लागेल.
4. रद्दी खरेदीची होणारी रक्कम खरेदी पूर्वी किंवा त्याच दिवशी कार्यालयात रोखीने अथवा NEFT/RTGS माध्यमातून भरावी लागेल. त्याशिवाय कार्यालयाबाहेर रद्दी नेता येणार नाही.
5. रद्दी विक्री झालेल्या रकमेवर 1 % (TCS) प्रथम भरणे आवश्यक राहील.
6. परिषदेने ठरवून दिलेल्या मुदतीत आणि स्व: खर्चाने रद्दी उचलावी लागेल. दिलेल्या मुदतीत रद्दी न उचलल्यास नियमानुसार दुसऱ्या खरेदीदारास रद्दी विकण्यात येईल.
7. परिषदेतील रद्दी विक्री करणे कालावधी हा कार्यादेशाच्या जावक दिनांकापासून ते 31 डिसेंबर 2022 या कालावधीसाठी राहील.
8. एकदा भरुन दिलेल्या दरात कोणत्याही कारणास्तव दुरुस्ती किंवा बदल करण्यास परवानगी दिली जाणार नाही.
9. दरपत्रकातील नमूद केलेल्या दरामध्ये खाडाखोड असू नये. असल्यास दरपत्रके ग्राह्य धरली जाणार नाहीत.
10. दरपत्रकांवर दराकाराची स्वाक्षरी नाव व शिक्का असणे आवश्यक आहे. दराकाराची स्वाक्षरी नाव शिक्का नसलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.
11. विहीत मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.
12. सदरच्या दरपत्रकामध्ये भाग घेण्यासाठी इच्छुक संस्थांनी खालील कागदपत्रांची (तांत्रिक बाबी) स्वतंत्र बंद लिफाफ्यामध्ये सादर करावीत. लिफाफ्यावर **"रद्दी विक्री बाबत तांत्रिक लिफाफा"** असा स्पष्ठ उल्लेख करावा. सादर करणाऱ्या लिफाफ्यावर ई मेल-आयडी, भ्रमणध्वनी क्रमांक, कंपनी / फर्मचे नांव पत्ता असणे अवश्यक आहे.

Scanned by CamScanner

13. दरपत्रक तपशीलामध्ये (रद्दी विक्रीचे) दर स्वतंत्ररित्या लेटरहेडवर नमूद करुन स्वतंत्र सिलबंद लिफाफा सादर करावे. बंद लिफाफ्यावर **"रद्दी विक्री बाबतचे दरपत्रक"** असे स्पष्ट नमूद करावे. सादर करणाऱ्या लिफाफ्यावर ई मेल-आयडी, भ्रमणध्वनी क्रमांक, कंपनी / फर्मचे नांव पत्ता असणे अवश्यक आहे.

14. दरपत्रक परिषदेस दि. 08 /08/2022 रोजी सायंकाळी 5.00 पर्यंत समक्ष / हस्तपोच सादर करावीत. मेल/स्पीड पोस्ट/ऑनलाईन दरपत्रके ग्राह्य धरली जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

15. तांत्रिक बाबीविषयीचे (कागदपत्रे) दरपत्रके उघडण्याचा दिनांक 10 /08/2022 रोजी दुपारी 12.00 वाजता शक्य असल्यास किंवा परिषदेच्या सोईनुसार उघडण्यात येतील.

16. कारण नमूद करुन अथवा असे कारण न देता आलेल्या एक अथवा सर्व दरपत्रके स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी राखून ठेवला आहे.

**तांत्रिक बाबी:-**

1. मुंबई दुकान व संस्था नोंदणी प्रमाणपत्र.
2. PAN व GST नोंदणी प्रमाणपत्र.
3. प्रोपायटर (मालक) यांचे पॅन कार्ड व आधार कार्ड साक्षांकित प्रत.
4. सनदी लेखापालाचे वार्षिक रु.5.00 लक्ष उलाढाल असल्याचे मागील तीन आर्थिक वर्षाचे (2018-2019, 2019-2020, 2020-2021,) वर्षाचे प्रमाणपत्र.
5. केंद्र शासन व राज्य शासनाच्या किंवा सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांचे कामाचा अनुभव असल्याचे मागील तीन वर्षाचे प्रमाणपत्र. (कार्यादेश विचारात घेतला जाणार नाही.)
6. शासन अंगीकृत संस्थांमध्ये काळ्या यादीमध्ये नाव अंतर्भूत नसल्याचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.
7. मागील तीन करनिर्धारण वर्षाचे (Assement Year) (2019-2020, 2020-2021, 2021-2022) ITR तसेच GST RETURN FILING सोबत सादर करावेत.

**रद्दी विक्री दरपत्रक**

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | | दर रक्कम रुपये | कागदपत्रे पल्पिंगसाठी पाठविण्यात येणाऱ्या पल्पिंग मिलचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| 1. | परीक्षेच्या वापरलेल्या जुन्या उत्तरपत्रिका | अ. डीएलएड परीक्षा 32 पानी, 20 पानी / 4 पानी पुरवणी **(प्रती क्विंटल)** | | |
| | | ब. टंकलेखन 4 पानी **(प्रती क्विंटल)** | | |
| | | क. लघुलेखन नोटपॅड **(प्रती क्विंटल)** | | |
| | | ड. OMR Sheet 1 पान वापरलेले **(प्रती क्विंटल)** | | |
| | | ई. स्वाक्षरीपट **(प्रती क्विंटल)** | | |
| 2. | पुठ्ठयांची खोकी **(प्रती किलो)** | | | |
| 3. | कापडी पिशव्या **(प्रती किलो)** | | | |
| 4. | वर्तमानत्र रद्दी (मराठी) **(प्रती किलो)** | | | |
| 5. | वर्तमानपत्र रद्दी (इंग्रजी) **(प्रती किलो)** | | | |
| 6. | कागदी तुकडे व कचरा इ. **(प्रती किलो)** | | | |
| 7. | रिकामी पाकिटे कागदी **(प्रती किलो)** | | | |
| 8. | रिकामी प्लास्टिक कोटेड पाकिटे **(प्रती किलो)** | | | |
| 9. | बुकलेट **(प्रती किलो)** | | | |
| 10. | प्रपत्रे, फाईल्स **(प्रती किलो)** | | | |

1/8/2022

(शैलजा दराडे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - 01

Scanned by CamScanner